# सर्वोदय-पात्र

१९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२८५

★

वि नो बा

REFBK-0009302

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रमांक २८१७ दा. क्र. क्रमांक ९२०८ ६५८५ दि. निव ५१
REFBK-0009302

# प्रस्तावना

'ध्यानाला आसन, चिंतनाला चलन' असें एक विनोबांचें सूत्र आहे. त्याप्रमाणें ३२ वर्षें त्यांनीं मांडी ठोकून विधायक कार्य केलें. फाळणीमुळें आणि म. गांधींच्या निर्याणामुळें देशांत जी परिस्थिति उत्पन्न झाली ती झाली नसती तर ते ध्यानांतून बाहेर पडले नसते. प्रथम त्यांनीं म. गांधी करीत असलेलें निर्वासितांचें काम केलें. पण त्या कामाला सरकारी नियंत्रणाची मर्यादा होती. म्हणून त्यांनीं तें त्या मर्यादेनंतर सोडून दिलें व कांचन-मुक्तीचा प्रयोग हातीं घेतला. त्यामुळें त्यांनीं वाहन वापरणें सोडून दिलें होतें. अशा स्थितींत त्यांना शिवरामपल्लीच्या सर्वोदय-संमेलनाला जायचें होतें. त्याला जाण्याकरितां ते पायीं च निघाले.

परत येतांना तेलंगणांतल्या अशांत भागांतून त्यांनीं बुध्या च प्रवास केला व त्यांना पोचमपल्ली येथें भू-दानाचा अपूर्व मंत्र प्राप्त झाला. त्या मंत्राची उपासना करीत ते अखंड सात वर्षें पदयात्रा करीत फिरत आहेत. भू-दानाची परिणति ग्रामदान-ग्रामस्वराज्यापर्यंत पोंचली. ४०–५० लाख एकर जमीन आणि सुमारे साडेतीन हजार ग्रामदानें प्राप्त झालीं आणि म्हैसूरजवळ एलवाल गांवीं भारतांतल्या सर्व पक्षांतील पुढाऱ्यांनीं ग्राम-दानाला संपूर्ण मान्यता दिली.

विनोबा रोज नवीन गांवीं जात असले तरी ते सुमारे अडीच हजार गांवीं गेले आहेत. आणि ४०–५० लाख एकर जमीन व साडेतीन हजार ग्रामदानें मिळालीं, त्यांत विनोबांच्याकडून स्फूर्ति घेऊन काम कर-णाऱ्या हजारों कार्यकर्त्यांच्या श्रमाचा मोठा भाग आहे. या कामाकरितां प्रांतोंप्रांतीं भू–दान–समित्या स्थापन झाल्या होत्या व त्या हजारों कार्यकर्त्यांना मदत करीत होत्या. या समित्यांना गांधी-निधीचें साहाय्य होतें. सुरवातीला गांधी-निधीची मदत उपयुक्त असली तरी असल्या क्रांतिकारक कार्याला ती बाधक होऊं लागली म्हणून विनोबांनीं समित्या च

बरखास्त केल्या व ती मदत घेण्याचें बंद केलें. कार्यकर्ते डरले नाहींत. त्यांनीं पोट बांधून काम केलें. आणि कित्येक अनामिक दात्यांनीं अनाहूत मदत दिली. त्यामुळें कामांत शिथिलता आली नाहीं.

पण कार्यकर्त्यांच्या योगक्षेमाचा प्रश्न सोडविणें आवश्यक होतें व त्याविषयीं विनोबांचें चिंतन हि चालू होतें च. त्यांतून त्यांना '**सर्वोदय-पात्राची**' कल्पना कर्नाटकांत उत्स्फूर्त झाली. तसें पाहतां या सर्वोदय-पात्राचें बीज केरळमधें च पेरलें गेलें होतें. त्याला त्यांनीं तेथें 'संमति-दान' हें नांव दिलें होतें.

भू-दान, ग्राम-दान, संपत्ति-दान इत्यादि गोष्टींना लक्षावधि कोटयवधि लोकांचा तत्त्वतः पाठिंबा आहे पण पुष्कळांना जमिनीचा, संपत्तीचा मोह सुटत नाहीं म्हणून ते त्यांत भाग घेत नाहींत व लज्जेनें दूर सरतात. ही गोष्ट विनोबांना डाचत होती. कोणी हि माणसानें आपल्याला भिऊं नये, ते भितात म्हणजे आपल्यांत हि कांहीं दोष आहेत असें मानून अशा लोकांच्याकडून नुसतें संमतीचें दान मागून विनोबांनीं त्यांना निर्भय केलें. पण संमति-दान म्हणजे निवडणुकींतील मतदाना-प्रमाणें एकदां मतदान केलें म्हणजे झालें, ही गोष्ट विनोबांना मान्य नाहीं. म्हणून या संमतिदानाला त्यांनीं शरीरश्रमाची जोड दिली. दर महिन्याला स्वतः कांतलेली एक सूतगुंडी देणें, हें संमतिदान होय. पण केरळमधें सूतकताई सार्वत्रिक नाहीं. तेथें नारळ घरोघरीं आहेत. म्हणून महिन्याला एक नारळ द्यायचें तेथल्या लोकांनीं कबूल केलें. त्याला विनोबांनीं मान्यता दिली. पण इतर ठिकाणीं नारळ सहज उपलब्ध नाहींत. तेथली काय वाट ? याचें चिंतन करतां त्यांना '**सर्वोदय-पात्र**' सुचलें. प्रत्येकाच्या घरीं, विकत घेतलेलें का होईना, धान्य असतें च. तेव्हां घरीं एक पात्र ठेवून त्यांत रोज एक मूठभर धान्य घालायचें. आणि तें हि लहान मुलाच्या हातानें. रोज मूठभर तांदूळ घातले तरी वर्षाच्या कांठीं सुमारे ९ रुपयाचे होतात असा हिशेब होतो. अशीं शंभर घरीं पात्रें ठेवलीं

जातील तर वर्षाला नऊशें रुपये जमतील व एका कार्यकर्त्याला महिना ७५ रुपये मानधन देतां येईल. गहूं घातले तर दोनशें घरें लागतील. जोंधळे घातले तर तीनशें घरें लागतील आणि अशा तऱ्हेनें हें सर्वोदय–आंदोलन खरें जनआधारित होईल.

दाराशीं भिकारी आला तर त्याच्या पदरांत आपण तुच्छबुद्धीनें एक मूठ धान्य फेकतों. तें तामसदान आहे. त्या बुद्धीनें 'सर्वोदय-पात्रांत' धान्य टाकायचें नाहीं. **आपण जन्माला येतों तें समाजाचें अनंत ऋण डोक्या-वर घेऊन येतों. तें फेडायचें तर आपल्या हाडांचीं काडें करून सतत झटलें तरी फिटायचें नाहीं. तें फेडण्याचा एक इसारा मात्र हें मूठभर धान्य, अशा नम्र बुद्धीनें हें धान्य द्यायचें आहे. आणि लहान मुलांना लहानपणापासून च या समाजऋणाची जाणीव व्हावी या दृष्टीनें च तें लहान मुलाच्या हातानें घालायचें, हा त्यांतला प्रमुख उद्देश आहे.**

दुसरी गोष्ट. एकदम तीस मुठी धान्य किती होतें तें मोजून महिन्याचें एकदम घालावें काय ? असें करणें बरोबर नाहीं. समाजाच्या ऋणाची आपल्याला सतत जाणीव राहिली पाहिजे या दृष्टीनें तें रोजच्या रोज घालत गेलें पाहिजे. देवावर अभिषेक करितात. थेंब थेंब पाणी किंवा बारीकशी धार सतत देवाच्या मस्तकावर पडत असते, त्याऐवजीं एक घागरभर पाणी एकदम ओतलें तर तो अभिषेक होईल काय ?

भूहीनाला कसायला जमीन मिळावी एवढ्या लहानशा उद्देशानें भू-दान-यज्ञ सुरू झाला. पण त्याचा विकास होत होत त्यानें ग्रामस्वराज्यापर्यंत मजल मारली. त्याप्रमाणें च 'सर्वोदय-पात्र' कार्यकर्त्यांच्या योगक्षेमाकरितां मुख्यत: असलें तरी त्याचा तेवढा च मर्यादित अर्थ नाहीं. उद्यां चीनमध्यें दुष्काळ पडला तर हें 'सर्वोदय-पात्र' चीनच्या मदतीला हि धावून जाईल.

हिंदुस्थान एक महान् देश आहे. त्याच्या प्रत्येक घरांत जर खरें 'सर्वोदय–पात्र' स्थापन होईल तर स्थूल दृष्टीनें भाक्रा–नांगल किंवा

कोयना धरण त्यापुढ क्षुद्र होत आणि सूक्ष्म दृष्टीनें हायड्रोजन आयटम बाँब हि त्याच्यापुढें हतप्रभ होतील अशी मोठी शक्ति या सर्वोदय-पात्राच्या बुडाशीं आहे.

हिंदुस्थान अफाट आहे ही त्याची एक प्रकारें शक्ति आहे. त्या बरोबर च तो विस्कळित आहे आणि शिस्तबद्ध नाहीं ही त्याची अशक्ति. 'सर्वोदय–पात्र' भारताची ही अशक्ति दूर करण्यास सहायभूत होईल.

विनोबांचें चिंतन आतां असें प्रभावी होऊं लागलें आहे कीं त्याचा परिणाम दूरवर हि सत्वर होतो. राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांनीं राजधानीमध्यें 'सर्वोदय-पात्राला' चालना दिली आहे.

सर्वोदय-पात्रांत जमणारें धान्य कोठें तरी मध्यवर्ति सर्वोदय-कार्यालय स्थापून एकत्र जमा करण्याची व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. असें एकत्र जमा झालें नाहीं तर तें निर्जीव ठरेल. समुद्रावर सूर्याच्या तापानें पाण्याची किती तरी वाफ होत असते पण ती विखुरलेली असल्यामुळें सर्व व्यर्थ जाते. ती च वाफ बॉयलरमध्यें एकत्र केली गेली म्हणजे त्यांतून हजारो अश्वशक्तीचें एंजिन चालूं शकते. जमलेलें धान्य एखाद्या सज्जन व्यापाऱ्या-मार्फत विकून टाकून त्याची पैशांत रक्कम करण्यास हरकत नाहीं. ही रक्कम मुख्यत: शांति-सैनिकाच्या, सर्वोदय-सेवकाच्या योगक्षेमार्थ वापरली जावी. आणि त्यांतून कांहीं उरली च तर ती सर्वोदयाचा विचार-प्रचार करण्याच्या कामीं च खर्च केली जावी. हा ग्रामसेवक कसा असावा आणि तो गांवाची किती आणि कशी सेवा करूं शकेल याचें सुंदर चित्र या पुस्तिकेंत रेखाटलेलें आहे.

हें काम मुख्यतः शहरांत करण्यासारखें आहे. मध्यम-वर्गाला भू-दान संपत्तिदान कठिण आहे. त्यांना 'सर्वोदय-पात्र' हें मोठें वरदान लाभलें आहे. स्त्रियांना या कामीं खूप च काम करतां येण्यासारखें आहे.

भरकन् वाढलेली मोठी संख्या क्षणभंगुर ठरते. भरकन् वाढणारीं झाडें थोड्या च काळांत वाळून जातात. आंब्यासारखे वृक्ष वाढायला उशीर

लागला तरी ते वर्षानुवर्षं टिकतात व मधुर फळें देतात. वनमहोत्सवास दरवर्षी लक्षावधि झाडें लावलीं जातात. त्यांतलीं शेंकडा एकादा टक्का हि लागत नाहींत. आदल्या वर्षीचा च खड्डा पुढील वर्षाच्या समारंभाला उपयोगी पडतो. तसें 'सर्वोदय-पात्राचें' होऊं नये. संख्येच्या भरीला पडून विचार न समजतां कांहीं तरी करून 'सर्वोदय-पात्र' ठेवण्याचा आग्रह करून संख्या वाढवूं नये. आपण समाजाचे ऋणी आहों. त्या ऋणाची फेड करण्याचा 'सर्वोदय-पात्र' हा इसारा मात्र आहे हें ज्यांना पटलें आहे त्यांनीं च 'सर्वोदय-पात्र' ठेवावें व ही च गोष्ट समजावून देण्याचा कार्यकर्त्यांनीं प्रयत्न करावा. विचार न समजतां असंख्य 'सर्वोदय-पात्रें' ठेवलीं गेलीं तरी हि त्यांतून जनशक्ति निर्माण होणार नाहीं. तें एक नुसतें तंत्र होऊन बसेल अशीं कित्येक तंत्रें परंपरानुगत म्हणून आम्ही नियमितपणें वर्षानुवर्षें करीत आहोंत. तीं कां करायचीं याचें मूळचें कारण हि आपण विसरून गेलेले असतों. असलीं तांत्रिक कर्में करून हि तीं निर्जीव होऊन जातात. 'सर्वोदय-पात्र' असें निर्जीव होऊं नये असें वाटत असेल त्यांनीं पू. विनोबांच्या नित्यनूतन विचारांचें परिशीलन केलें पाहिजे व त्याकरितां 'भू-दान-यज्ञ' या साप्ताहिकाचे वर्गणीदार झाले पाहिजे, तर च आपले विचार हि स्पष्ट राहतील आणि असे विचारपूर्वक ठेवलेलें 'सर्वोदय-पात्र' च शक्तिशाली होईल.

**सांगली,**
ता. ३०।४।५८

**वामन जनार्दन कुंटे.**

---

कोयना धरण त्यापुढ क्षुद्र होत आणि सूक्ष्म दृष्टीनें हायड्रोजन आयटम बाँब हि त्याच्यापुढें हतप्रभ होतील अशी मोठी शक्ति या सर्वोदय-पात्राच्या बुडाशीं आहे.

हिंदुस्थान अफाट आहे ही त्याची एक प्रकारें शक्ति आहे. त्या बरोबर च तो विस्कळित आहे आणि शिस्तबद्ध नाहीं ही त्याची अशक्ति. 'सर्वोदय–पात्र' भारताची ही अशक्ति दूर करण्यास सहायभूत होईल.

विनोबांचें चिंतन आतां असें प्रभावी होऊं लागलें आहे कीं त्याचा परिणाम दूरवर हि सत्वर होतो. राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांनीं राजधानीमध्यें 'सर्वोदय-पात्राला' चालना दिली आहे.

सर्वोदय-पात्रांत जमणारें धान्य कोठें तरी मध्यवर्ति सर्वोदय-कार्यालय स्थापून एकत्र जमा करण्याची व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. असें एकत्र जमा झालें नाहीं तर तें निर्जीव ठरेल. समुद्रावर सूर्याच्या तापानें पाण्याची किती तरी वाफ होत असते पण ती विखुरलेली असल्यामुळें सर्व व्यर्थ जाते. ती च वाफ बॉयलरमध्यें एकत्र केली गेली म्हणजे त्यांतून हजारो अश्वशक्तीचें एंजिन चालूं शकते. जमलेलें धान्य एखाद्या सज्जन व्यापाऱ्या-मार्फत विकून टाकून त्याची पैशांत रक्कम करण्यास हरकत नाहीं. ही रक्कम मुख्यत: शांति-सैनिकाच्या, सर्वोदय-सेवकाच्या योगक्षेमार्थ वापरली जावी. आणि त्यांतून कांहीं उरली च तर ती सर्वोदयाचा विचार-प्रचार करण्याच्या कामीं च खर्च केली जावी. हा ग्रामसेवक कसा असावा आणि तो गांवाची किती आणि कशी सेवा करूं शकेल याचें सुंदर चित्र या पुस्तिकेंत रेखाटलेलें आहे.

हें काम मुख्यत: शहरांत करण्यासारखें आहे. मध्यम-वर्गाला भू-दान संपत्तिदान कठिण आहे. त्यांना 'सर्वोदय-पात्र' हें मोठें वरदान लाभलें आहे. स्त्रियांना या कामीं खूप च काम करतां येण्यासारखें आहे.

भरकन् वाढलेली मोठी संख्या क्षणभंगुर ठरते. भरकन् वाढणारीं झाडें थोड्या च काळांत वाळून जातात. आंब्यासारखे वृक्ष वाढायला उशीर

लागला तरी ते वर्षानुवर्ष टिकतात व मधुर फळें देतात. वनमहोत्सवास दरवर्षी लक्षावधि झाडें लावलीं जातात. त्यांतलीं शेंकडा एकादा टक्का हि लागत नाहींत. आदल्या वर्षीचा च खड्डा पुढील वर्षाच्या समारंभाला उपयोगी पडतो. तसें 'सर्वोदय-पात्राचें' होऊं नये. संख्येच्या भरीला पडून विचार न समजतां कांहीं तरी करून 'सर्वोदय-पात्र' ठेवण्याचा आग्रह करून संख्या वाढवूं नये. आपण समाजाचे ऋणी आहों. त्या ऋणाची फेड करण्याचा 'सर्वोदय-पात्र' हा इसारा मात्र आहे हें ज्यांना पटलें आहे त्यांनीं च 'सर्वोदय–पात्र' ठेवावें व ही च गोष्ट समजावून देण्याचा कार्यकर्त्यांनीं प्रयत्न करावा. विचार न समजतां असंख्य 'सर्वोदय-पात्रें' ठेवलीं गेलीं तरी हि त्यांतून जनशक्ति निर्माण होणार नाहीं. तें एक नुसतें तंत्र होऊन बसेल अशीं कित्येक तंत्रें परंपरानुगत म्हणून आम्ही नियमितपणें वर्षानुवर्षे करीत आहोंत. तीं कां करायचीं याचें मूळचें कारण हि आपण विसरून गेलेले असतों. असलीं तांत्रिक कर्में करून हि तीं निर्जीव होऊन जातात. 'सर्वोदय-पात्र' असें निर्जीव होऊं नये असें वाटत असेल त्यांनीं पू. विनोबांच्या नित्यनूतन विचारांचें परिशीलन केलें पाहिजे व त्याकरितां 'भू-दान-यज्ञ' या साप्ताहिकाचे वर्गणीदार झाले पाहिजे. तर च आपले विचार हि स्पष्ट राहतील आणि असे विचारपूर्वक ठेवलेलें 'सर्वोदय-पात्र' च शक्तिशाली होईल.

**सांगली,**
ता. ३०।४।५८

**वामन जनार्दन कुंटे.**

---

## अनुक्रमणिका

१. सर्वोदय-पात्र म्हणजे घरोघरीं द्रौपदीची स्थाली

२. मूठभर धान्य – जगभर शांति

३. ग्रामसेवक

४. सर्वोदय-पात्र म्हणजे भिक्षा-पात्र नव्हे

क्र. ८५९८

: १ :

# सर्वोदय-पात्र म्हणजे घरोघरीं द्रौपदीची स्थाली

आज या दोन गांवांनीं ग्रामदानाचा संकल्प केला आहे. म्हणजे या दोन गांवांनीं प्रेमराज्याचा संकल्प केला आहे. '**संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ**'. प्रेमाचा सुकाळ झाला म्हणजे इतर सर्व गोष्टींचा सुकाळ होतो, आणि प्रेमाचा दुष्काळ झाला म्हणजे इतर सर्व गोष्टींचा दुष्काळ होतो. कारण प्रेमानें माणसें एकवटतात आणि मग गांवची संपत्ति वाढते, असा अनुभव च आहे. ग्रामदानांत कांहीं हि भय नाहीं. त्यांत सामील होणाऱ्यांना तर भय नाहीं च. पण सामील न होणाऱ्यांना हि भय वाटतां कामा नये. त्यांच्यावर आपण प्रेम केलें पाहिजे. हें ग्रामदानाचें पथ्य आहे. जसें एखादें औषध वगैरे घेतलें कीं, त्याचें कांहीं पथ्य असतें तसें च हें आहे.

आज कांहीं ग्रामदानी गांवांची मंडळी मला भेटायला आली होती. एकजण म्हणाले कीं, दान म्हटल्यावर आम्हांला भीति वाटते. हें भय काय बागुलबुवाचें आहे ? हें काय एखाद्या वाघाचें भय आहे ? ही अंधाराची भीति आहे. अंधार गेला कीं ती भीति जाईल. ग्रामदान केलें आतां आपलें कसें होईल ? जमिनीचें काय होईल ? ही कल्पनेची भीति आहे. प्रत्यक्ष अनुभवानें ती जाईल. प्रथम कोणी तरी रस्ता तयार करावा लागतो. मग त्या रस्त्यानें मागाहून ज्यांना भीति वाटते ते येतील. '**पुढें गेले त्यांचा शोधीत मारग**' असें संतांचें म्हणणें आहे.

## पांच हजारांमागें एक सेवक

आतां हा विचार सर्व लोकांपर्यंत, सगळ्या गांवांमध्यें गेला पाहिजे. तो कसा जाईल ? आपला हिंदुस्थान देश आधीं मोठा. आपला रत्नागिरी जिल्हा हि २५० मैल लांब. पावसाळ्यांत फिरतां च येत नाहीं. म्हणून हा प्रेमाचा संदेश सर्वांच्या कानावर घालण्याची योजना केली पाहिजे. त्यासाठीं गांवोगांवीं सर्वोदय-सेवक तयार केले पाहिजेत. त्यांना शिक्षण

दिलें पाहिजे. हा विचार जातिभेद, प्रांतभेद, राष्ट्रभेद यांविरहित आहे. या विचारानें गांवाची कशी उन्नति होईल तें समजलें पाहिजे. हें शिक्षण त्यांना कोण देणार ? हे अप्पासाहेब आहेत. त्यांचा आश्रम आहे. अशा ठिकाणीं त्यांची शिक्षणाची सोय झाली पाहिजे. पांच हजार लोकांमागें एक सेवक, असें धरलें तर असे ३६० सेवक पाहिजेत. तुमच्या जिल्ह्यामध्यें गोविंदराव शिंदे काम करतो. पण असे ३६० लोक निर्माण झाले पाहिजेत. आणि असे सेवक तुमच्या जिल्ह्यामध्यें तयार होतील हि. एका बाजूला विशाल समुद्र आहे. दुसऱ्या बाजूला उंच पर्वत आहे. अशी सुंदर दृश्यें तुम्ही नेहमीं पाहतां. अशा ठिकाणीं हें काम यशस्वी होईल.

## द्रौपदीची स्थाली सर्वोदय-पात्र

वाचेचा रसाळ, अंतरीं निर्मळ आणि पायाचा शाबूत असा सेवक असला पाहिजे. त्याच्या योगक्षेमाची सोय केली पाहिजे. योगक्षेम म्हणजे तरी काय ? त्यांना काय पेटी भरायची आहे ? त्यांना पोट भरायचें आहे. मीं एक अशी छान योजना काढली आहे. प्रत्येक घरीं एक 'सर्वोदयपात्र' असावें. महाभारतामध्यें त्या द्रौपदीला सूर्यानें दिलेलें एक अक्षयपात्र होतें. त्यामध्यें रोजच्या पुरतें भरपूर अन्न मिळावयाचें. उद्यांचें उद्यां; त्याची काळजी आज नाहीं. तसें प्रत्येक घरांत एक पात्र ठेवावें. त्यामध्यें लहान मुलांच्या हस्तें एक मूठ तांदूळ दररोज टाकायचे. त्याला एक झांकण ठेवावें. नाहीं तर सेवकाच्या ऐवजीं उंदराची च सोय व्हायची.

## मुलें चारित्र्यवान् होतील

त्या मुलाला शिकवावें,––सर्वोदय विचाराच्या प्रसारासाठीं, देशाच्या उन्नतीसाठीं दररोज जेवणापूर्वीं एक मूठ या पात्रांत टाकायची. त्या मुलाचें केवढें शिक्षण होईल ! तीं चारित्र्यवान्, निष्ठावान् निपजतील अशी माझी खात्री आहे. आणि मुलें दररोज त्या पात्रांत मूठभर तांदूळ टाकतील त्यांना

एकदां वळण लागलें कीं, ती गोष्ट केल्याशिवाय तीं जेवणार च नाहींत. कारण त्यांचीं हृदयें परमेश्वराच्या जवळ असतात ना ? पण हळूं हळूं त्यांना इथली हवा लागते आणि शिंगें फुटूं लागतात. म्हणून मी मुलांना सांगतों कीं, आंघोळ करतांना इतर शरीर स्वच्छ करा च परंतु त्या च बरोबर कपाळ जोरानें चोळा. म्हणजे शिंगें येणार नाहींत.

पांच हजार माणसांमागें एक सेवक म्हणजे एक हजार माणसांच्या हजार मुठी तांदूळ जर त्या सर्वोदय-पात्रांत पडले तर पुष्कळ च होतील. आणि कोणावर त्याचा भार नाहीं. अशी योजना रत्नागिरी जिल्हाभर निघाली पाहिजे. मी अजून दानें च मागत होतों. भूदान, ग्रामदान, बुद्धि-दान, जीवनदान; एकापेक्षां एक कठीण. पण आतां या सर्वोदयपात्राची योजना फार सोपी आहे. ही योजना प्रत्येक घरोघर जर नेऊन पोंचविली, तिचा देशभर प्रसार केला तर एक घर असें राहणार नाहीं कीं जिथें सर्वोदय-पात्र नाहीं. लोकांमध्यें किती सहानुभूति आहे ! मी आतां सात, आठ प्रांत फिरून आलों. अनेक गांवें शहरें पाहिलीं. जनतेमध्यें किती उत्साह आहे ! प्रेम आहे ! मीं प्रत्येक प्रांतांत पाहिलें, शाळेंतील टेक्स्ट-बुकें जर सोडलीं— कारण तीं सक्तीनें प्रत्येक विद्यार्थ्याला घ्यावीं च लागतात — तर सर्वोदय-साहित्याचा च सर्वांत जास्त खप आहे. कुठें कुठें कम्युनिस्ट साहित्य खपतें. परंतु सर्वोदयाच्या साहित्याइतकें कुठलें च साहित्य आज खपत नाहीं. आपण जाऊन पोंचण्याचा च अवकाश, लोक साहित्य घेतात. हें साहित्य वर्तमान-पत्राच्या साहित्यासारखें नव्हे.

### अंधःकार टिकणार नाहीं

कांहीं ठिकाणीं या विचाराबद्दल गैरसमज हि आहेत पण ते अज्ञाना-मुळें आहेत. पण ज्ञानापुढें अज्ञान कसें टिकेल ? प्रकाशापुढें अंधार कसा टिकेल ? समजा एखाद्या गुहेमध्यें १००० वर्षांपूर्वीचा काळाकुट्ट अंधार आहे. पण तिथें प्रकाश नेला तर काय तो अंधार किती हि जुना असला तरी राहील ? प्रेमानें समजाविलें पाहिजे. म्हणजे गैरसमज दूर होतील. माझ्याकडे इतके लोक येतात. त्यांचे गैरसमज असतात. येतात प्रश्न

विचारतात. त्यांचें समाधान होतें. त्याला काय करणार ? खडीसाखर तोंडांत टाकली म्हणजे तोंड गोड होतें तें वांकडें कसें होईल ?

## शांति-सैनिक हवेत

यासाठीं सेवकवर्ग उभा राहिला पाहिजे. आणि तो हि होतो च आहे. आज च दोन शांतिसैनिक झाले. त्या अल्लाउद्दिनाची सेना असे. तिनें मोठी लूट केली कीं त्या लुटीचा कांहीं भाग त्याला मिळत असे. त्यामुळें त्याच्या सेनेंत पुष्कळ लोक दाखल होत असत. पण आमच्या शांति-सैनिकांना आम्ही काय सांगतों ? पहिली गोष्ट : तुम्हांला सेवा केली पाहिजे. दुसरी गोष्ट : वेळप्रसंगीं मधें पडून मरायला तयार असलें पाहिजे. आणि याबद्दल आम्ही त्यांना मोबदला मात्र कांहीं देणार नाहीं. असें असून हि काल स्वागताचेवेळीं आप्पासाहेब, गोविंद शिंदे, पर्वतराव वळसे आणि चंद्रा किर्लोस्कर हे शांति-सैनिक झाले. माणसें येऊन राहिलीं आहेत. त्यांच्या योगक्षेमासाठीं सर्वोदय-पात्र घरोघर पाहिजे. एक एक मूठ दररोज टाकली पाहिजे.

आतां च एक गांवकरी म्हणाले, 'दान म्हटल्यावर लोकांना भीति वाटते.' मीं म्हटलें, या गांवकऱ्यांनीं ग्रामदान केलें आहे. त्यांच्या छातीवर हात ठेवून पहा बघूं कुठें धडधड ऐकूं येते का ? दानाला कोण भितो ? माझी आई लहानपणीं म्हणत असें, 'विन्या, देतो तो देव आणि राखतो तो राक्षस.' म्हणजे दानाची भीति राक्षसाला वाटेल. आतां काय ही राक्षस-नगरी लंका आहे ? ही तर रत्नागिरी आहे. भिक्षा मागतांना सुद्धां म्हणतात, अरे बाबा, धर्म करा रे ! दान म्हणजे च धर्म, इतकी ज्याची प्रतिष्ठा आहे, त्याला घाबरण्याचें काय कारण ? का कोणी असें सांगतोय कीं ग्रामदान करा आणि त्या जमिनी ज्या परशुरामानें समुद्रांतून काढल्या त्या देऊन टाका आणि तुम्हीं जा समुद्रांत ? असें नाहीं. ही माती म्हणजे माता आहे. प्रत्येकाला एक नाक आहे. तेव्हां श्वासोश्वास करण्यासाठीं सर्वांना मुबलक हवा आहे. तहान प्रत्येकाला आहे. पाणी हि सर्वांना आहे. त्या च प्रमाणें ही जी जमीन आहे ती सर्वांसाठीं आहे. ती कोणी हि राखून कां ठेवावी ?

मराठी ग्रंथ सं... ठाणे. स्थापना
अनुक्रम २८१२७ ... वि: निबंध

जो जो जेवतो त्यानें आपल्या घरीं सर्वोदय-पात्र ठेवलें पाहिजे. हे जे कोणी माझ्या समोर बसले आहेत, हीं मुलें आहेत हे च आमचे संदेशवाहक. मुलगा घरीं गेला. बाप हि गेला. त्यांनीं ही योजना करायची ठरविली. केव्हांपासून करायची ? बाप म्हणेल उद्यांपासून. मुलगा म्हणेल आजपासून च कां नको ? अशा रीतीनें सर्वोदय-सेवकांची एक सेना उभी करतां आली पाहिजे, म्हणून ही साधी योजना सर्वांनीं करावी.

---

: २ :

# मूठभर धान्य – जगभर शांति

नुकतें च बिहारमध्यें चाललेल्या सर्वोदय–पात्राच्या कामासंबंधीं एक पत्र आलें आहे. मुंगेर जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं हें काम व्यापक करण्याचें ठरविलें आहे. आपले पूजनीय राष्ट्रपति राजेन्द्रबाबू यांच्या घरीं एक सर्वोदय–पात्र ठेवलें आहे आणि त्यांनीं आशीर्वाद देऊन आशा प्रकट केली आहे कीं, 'अशा प्रकारचें सर्वोदय–पात्र हिंदुस्थानांतील प्रत्येक घरांत व्हावें.' राजेन्द्रबाबूंचा आशीर्वाद या कार्याला लाभल्यानंतर त्याचा अंमल हिंदुस्थानांत सगळीकडे होईल, पण बिहारमध्यें तर उत्तम च होईल. बाकी हरि तें काम करील च ! मीं हें काम फार कठिण किंवहुना अशक्यप्राय समजून च घेतलें आहे. तें सोपें असतें, तर मीं लोकांपुढें मांडलें च नसतें.

दिसायला सोपें आणि असायला फार कठिण, असें हें काम आहे. प्रत्येकानें सर्वोदय-पात्रांत मूठभर धान्य टाकायचें–नियमित टाकायचें आणि तें शाबूत स्वरूपांत एखाद्या मुक्कामावर पोहोंचवायचें, त्याच्या आधारानें शांतिसेना तयार करायची आणि त्या आधारानें निरनिराळ्या क्षेत्रांत काम चालूं राहायचें, हा प्रवाह अखंड चालूं राहायचा, त्या शांति-सैनिकांची सेवा

लोकांना मानवायची आणि त्यांच्या हातून प्रसंगीं विशेष पराक्रम व्हायचा, त्याचा परिणाम देशावर होऊन पोलिसांची गरज उरायची नाहीं. त्याचा परिणाम मध्यवर्ती सरकारवर व्हायचा व मग सेनेची आवश्यकता उरायची नाहीं; मग त्याचा परिणाम जगावर व्हायचा आणि जगांत सर्वोदय राज्य कसें स्थापित करतां येईल याचें दर्शन सर्वांना व्हायचें; मग सर्व जगांत अहिंसक शक्ति बलवान् व्हायच्या व शांतता स्थापन व्हायची ! म्हणजे अशा रीतीनें मूठभर धान्यापासून जगभर शांति व्हायची. अशा रीतीनें एका मुठींत एवढें सामर्थ्य आहे. असें म्हणणें अगदीं अशक्य आहे, असा यावर कुणीं आक्षेप घेतला तर मला तो फार च कमी वाटेल. लोक कांहीं आक्षेप घेतात तेव्हां मीं म्हणतों कीं, तुम्हीं चिंता कशाला करता ? हें मुळीं होणारें काम च नाहीं.—कुठें एखाद्या क्षेत्रांत होऊं तर द्या. सैनिक असेल तर घरोघर सर्वोदय-पात्र बनवायचें आणि घरोघर पात्र असलें तर त्याच्या आधारानें सैनिक तयार व्हायचे. हा जो अन्योन्याश्रय आहे, तो फार मजेदार आहे. रामनाम सोपें आहे असें सांगितलें आहे आणि जन्मभर रामनाम घेतलें व अंतकाळीं आठवलें तरी भागेल असें हि म्हटलें आहे. राम हें इतकें सोपें नाम आहे कीं, नुसतें तोंड उघडलें तरी अर्ध्या नामाचा उच्चार होतो. पण तें इतकें सोपें आहे, म्हणून का लाखों लोक नाम घेऊन मोक्षाकडे जाऊन राहिले आहेत ? अगदीं बोटी भरभरून परतीराला जात आहेत, पोहायची गरज च उरली नाहीं, असा देखावा कांहीं दिसत नाहीं. म्हणून तें इतकें सोपें आहे कीं, अतिशय कठिण आहे, असें त्याला रूप येतें. मोक्ष म्हणजे सर्वांत मोठी वस्तु आणि रामनाम म्हणणें सर्वांत सोपें काम. म्हणजे सर्वांत सोप्या कामानें सर्वांत मोठी वस्तु गांठायची, अशी जोड आहे. तसें च मीं केलें आहे. मूठभर धान्यानें साऱ्या जगभर—निदान भारतभर तरी शांति गांठायची आहे. पण भारताचें नशिब असें आहे कीं इतक्या अव्यवहारी योजनेला हि व्यवहार्य समजून लोक तिकडे आशेच्या नजरेनें बघतात. याचा अर्थ असा कीं, आज लोकांत इतकी निराशा आहे कीं, कुठें एखादा आशेचा किरण जरी सांपडला तरी त्यांना वाटतें कीं, आतां कांहीं तरी होणार च. या कार्याला राष्ट्रपतींचा सक्रिय आशीर्वाद

मिळतो, ही फार मोठी शक्ति आहे. आज घटनात्मकदृष्टया राष्ट्रपतींच्या हातांत जितकी शक्ति आहे तितकी दुसऱ्या कोणाच्या हातीं आहे ? पाकिस्तानचा राष्ट्रपति वाटेल तेव्हां एक मंत्रिमंडळ बरखास्त करून दुसरें आणतो. आपले राष्ट्रपति तो अधिकार वापरत नाहींत ही गोष्ट वेगळी. पण मनांत आणलें तर त्यांना घटनेद्वारें सर्व अधिकार वापरतां येतील. एवढी मोठी सत्ता हातीं असलेला आपला पूजनीय नेता आपल्या घरांत सर्वोदय-पात्र स्थापन करतो. मी तर तें वाचून इतका विरघळून गेलों कीं, माझ्या चित्तावर काय परिणाम झाला, तें मला शब्दांत सांगतां येत नाहीं. हें इतकें अशक्यप्राय कार्य असलें तरी ईश्वरानें उचललें तर होईल च. पण मला सारखें वाटतें कीं, हें अशक्यप्राय काम असल्यामुळें कुठें तरी हें करून दाखवायला हवें. एखाद्या तरी क्षेत्रांत ठिणगी पेटायला हवी.

**नारायणी-शक्ति प्रकट करा**

निधिमुक्तीनंतर आमचे कार्यकर्ते अगदीं भिंतीशीं टक्कर देऊन राहिले आहेत. त्यांची संख्या फार नाहीं. हजार–दोन हजार असेल, आणि शांतिसेनेला तर निदान एक लाख तरी सैनिक हवेत च. कोणत्या हि मिलिटरी किंवा पोलिस संघटनेला इतका कमी खर्च येणार नाहीं, तितका शांतिसेनेला येईल. एक लाख सैनिकांद्वारां सबंध भारताची शांति आणि ती हि मूठभर धान्याच्या आधारें आणि तें मूठभर धान्य हि भारताच्या २५ टक्के घरांत असलें तरी पुरे हा अगदीं नगण्य घरखर्च आहे. आज जगांतल्या सर्व देशांत सैन्यावर होणाऱ्या खर्चाचे जे आंकडे आहेत ते तसे आंकडे फक्त ज्योतिषशास्त्रांत च पहायला सांपडतात. त्या मानानें याचा खर्च किती अल्प आहे, याचा विचार करा. त्यांत क्रान्तिबीज, अभयबीज आहे. '**केल्यानें होत आहे रे। आधीं केलें च पाहिजे**' –– हें सांगायला रामदासांसारख्या मोठ्या माणसाची काय गरज आहे ? पण त्याचा अर्थ ध्यानांत घ्यायला हवा '**यत्न तो देव जाणावा।**' प्रयत्न हा च परमेश्वर ! सामूहिक प्रयत्न झाला तर च नारायणी-शक्ति प्रकट होईल.

## शक्तीचें अधिष्ठान

रत्नागिरी जिल्ह्यांत हें काम अवश्य व्हायला पाहिजे व प्रयत्न केल्यास होऊं शकतें. पण अशा कार्यक्रमासाठीं बुद्धीची गरज आहे. महाराष्ट्रांत आल्यावर मीं बुद्धीची गरज सांगावी, याचें तुम्हांला आश्चर्य वाटेल. कारण महाराष्ट्र हा बुद्धिप्रधान आहे, असें म्हटलें जातें. पण एकूण आपल्या देशाची, आणि त्याला महाराष्ट्र हि अपवाद नाहीं, बुद्धि आज जागेवर नाहीं. म्हणजे ज्या ठिकाणीं ती असायला हवी, तिथें ती नाहीं. स्वराज्य मिळण्यापूर्वीं राजकारणाला जें महत्त्व होतें तें स्वराज्यप्राप्तीनंतर उरत नाहीं, हें अजून लोकांच्या बुद्धीला उमगलें नाहीं. स्वराज्यापूर्वींचें राजनीतीचें कार्य हें लोकनीतीचें कार्य होतें. स्वराज्याशिवाय राष्ट्राला नैतिक आधार च येऊं शकत नाहीं, म्हणजे तें केवळ स्थूल Politics चें कार्य नव्हतें तर त्याला धर्मकार्याचें स्वरूप होतें. त्याला नैतिक अधिष्ठान होतें. तिथें खूप त्याग करावा लागत होता. म्हणून त्यांत शक्तीचें अधिष्ठान हि होतें. पण आतां शक्तीचें अधिष्ठान सामाजिक आणि आर्थिक क्रांतीच्या कार्यांत आहे. कारण तिथें त्याग करावा लागतो. राजकारणांत कसला त्याग करावा लागतो ? तिथें तर अधिकाराच्या जागेवर जायचें असतें आणि जे जाऊं शकत नाहींत, त्यांनीं त्या जागेवर गेलेल्यांचा मत्सर करायचा असतो ! लोक म्हणतात कीं, त्यांत चर्चा, भाषणें वगैरे करायचीं असतात. पण या सर्वांची गणना मी निष्क्रियतेंत करतों. ज्या वेळीं राष्ट्र बोलू च शकत नव्हतें त्यावेळीं 'आम्हाला स्वराज्य पाहिजे' असें नुसतें बोलणें म्हणजे फार मोठी गोष्ट होती. त्यावेळीं साधा आखाडा काढला तर त्यावर इंग्रजसरकारची दृष्टि जायची. आतां त्या आखाड्यांचें सरकारला काय भय होतें ? त्यांच्याजवळ तर बंदुका होत्या ! यांच्या दंड-बैठकांमुळें त्यांना कसला धोका निर्माण होणार होता ? पण तरी हि सरकारचे गुप्त पोलिस आखाड्यांभोंवतीं हिंडायचे. त्या वेळीं साधें 'वंदे मातरम्' म्हणणें देखील कठीण होते. त्याचा अर्थ 'आईला नमस्कार' एवढा च आहे. एका ठिकाणीं टिळकांचें नांव द्यायचें असें लोकांच्या मनांत असून हि सरकारच्या ध्यानांत येऊं नये म्हणून 'ठळक-वाडी' हें नांव दिलें. ज्या काळांत लोकमान्यांचें नांव घेणें हि कठीण होतें,

अशा त्या काळांत जे लोक कांहीं बोलत होते, त्यांच्या त्या बोलण्यांत च सक्रियता होती. पण आज तुम्हांला सर्व प्रकारचें क्रियास्वातंत्र्य आहे. आजचीं वर्तमानपत्रें तर असें लिहितात कीं, त्याला ताळ ना तंत्र ! कोणी हि कोणा-वर वाटेल तशी टिका करतो. तरी सरकारतर्फे कांहीं ॲक्शन घेतली जात नाहीं. इतकें स्वातंत्र्य असतांना लोक जर नुसते बोलत च राहिले तर ती सक्रियता ठरणार नाहीं.

## सारी श्रद्धा सत्तेवर

आज लोकांची सारी श्रद्धा सत्तेवर आहे. 'सत्ता हातीं घेऊं आणि मग कांहीं करून दाखवूं.' असें च सारे म्हणतात. म्हणजे सारें कर्तृत्व सत्ताधाऱ्यांच्या हातीं सोंपवून आम्हीं आपल्या हातीं फक्त वक्तृत्व घेतलें आहे. लोकांना अजून हि वाटतें कीं लोकमान्य व गांधीजी यांनीं ज्या क्षेत्रांत काम केलें त्या च क्षेत्रांत आम्ही हि काम करीत आहोंत. पण आतां त्या क्षेत्रांत शक्ति उरली नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. लोकमान्यांना एकानें विचारलें होतें कीं 'स्वराज्य मिळाल्यानंतर तुम्ही कोणता Portfolio (खातें) हातीं घेणार ?' त्यावर ते म्हणाले, 'स्वराज्यानंतर मी गणिताचा प्रोफेसर होईन किंवा वेदाभ्यास करेन.' आणि जेव्हां १५ ऑगस्ट ४७ ला तुमचा स्वराज्याचा उत्सव चालू होता, तेव्हां गांधीजी तिकडे दूर नौखालींत पदयात्रा करीत होते. म्हणजे तुमचे मोठ्यांतले मोठे दोन नेते, ज्यांनीं स्वतःला राजकारणांत आकंठ बुडवून घेतलें होतें, त्यांना माहीत होतें कीं स्वराज्य आल्यानंतर राजकारण, हातीं सत्ता घेणें, म्हणजे 'जैसे थे' राखून सेवा करणें आहे, त्यांत क्रांति नाहीं. उत्पादन वाढविणें ही च जर क्रांति असेल तर अमेरिका व रशियांत तर भरपूर उत्पादन आहे, मग काय तिथें क्रांति आहे ? हिंदुस्थानचें जीवनमान अत्यंत खालावलेलें असल्यामुळें देशाला उत्पादन वाढविण्याची गरज आहे, यांत शंका च नाहीं. पण तें लोकशक्तीनें वाढलें तर क्रांति होईल. निर्भयतेऐवजीं लश्कर, दयेऐवजीं दवाखाने व दानाऐवजीं कर अशी आज स्थिति आहे. पण निर्भयता, दया व दानानें जें कार्य होईल, तें लश्कर, दवाखाने व कर यांच्या द्वारें कधीं

तरी होईल का ? लष्करावर विसंबून राहणारें राष्ट्र सदैव भयभीत च राहील. लढाईत च आपली सेना दूरच्या आघाडीवर दहा पावलें मागे हटली तर देशावर, बाजारभावावर त्याचा परिणाम होईल. लष्करावर अवलंबून राहणाऱ्या लोकांच्या हातीं कसलें कर्तृत्व राहील ? तेव्हां बाबांनो, ज्या क्षेत्रांत लोकमान्य होते तें क्षेत्र म्हणजे आजचें राजकारण नव्हे, हें लक्षांत घ्या. लोकमान्यांचें व गांधीजींचें क्षेत्र म्हणजे आज ग्रामदानाचें क्षेत्र आहे. लोकाधार सोडून बाकीचे सर्व आधार तोडून उन्हातान्हांत वणवण हिंडायचें हें च त्यांचें क्षेत्र आहे, हें अजून लोकांच्या लक्षांत येत नाहीं व त्यांना वाटतें कीं, राजकारण हें च लोकमान्यांचें क्षेत्र. बुद्धींत ही जो स्पष्टता यायला हवी होती, ती आली नाहीं. हा बुद्धीचा दोष आहे. बुद्धीला हा विचार ग्रहण झाला नाहीं.

## लोकमान्यांचा खरा वारसा

लोकमान्यांनंतर त्यांच्या कौन्सिलांत जाऊं इच्छिणाऱ्या कांहीं अनुयायांना वाटायचें कीं, लोकमान्यांचा वारसा आमच्याकडे आहे व गांधीजींनीं नवीन च कांहीं तरी काढलें आहे. पण वस्तुस्थिति काय होती तें पहा. ज्या लेखासाठीं लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली, तो लेख मुळीं त्यांनीं लिहिला नव्हता च. त्यांच्या एका साथीदारानें तो लेख लिहिला होता. पण त्यांनीं सर्व स्वतःवर घेतलें. अगदीं scape-goat प्रमाणें स्वतःचें बलिदान केलें. आणि त्या लेखांतील प्रत्येक वाक्याचा बचाव केला. आपल्या साथीदाराचा बचाव करण्यांत ही जो त्यांची वीरश्री होती, ती आतां कुठें आहे ? आतां त्या क्षेत्रांत जाणारे एकमेकांचा मत्सर तेवढा करीत असतात. तेव्हां आज वर्तमानपत्रांत लिहिणें म्हणजे लोकमान्यांच्या क्षेत्रांत जाणें आहे, असें मानणें ही दिशाभूल आहे. कित्येकांना असें हि वाटतें कीं, लोकमान्य योग्य वेळीं गेले हें ठीक च झालें, नाहीं तर गांधीजी आल्यानंतर काय परिस्थिति निर्माण झाली असती ? पण हा विचार अगदीं चूक आहे. लोकमान्यांना देशाची नाडी अचूक ओळखतां येत होती. अवंतिकाबाई गोखले यांनीं लिहिलेल्या गांधीजींच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत

लोकमान्यांनीं लिहिलें आहे कीं 'एका नवीन शक्तीचा उदय होत आहे. तिच्या आधारानें राष्ट्राचें चारित्र्य व शील वाढेल. ती शक्ति म्हणजे गांधीजी'—लोकमान्यांच्या काळांत वर्तमानपत्रांत लेख लिहिणें म्हणजे फंटवर जाऊन लढणें च होतें. पण आज तशीं कामें करून आपण त्यांच्या क्षेत्रांतले त्यांचे वारसदार आहोंत असें ज्या बुद्धीला वाटतें, ती बुद्धि च नव्हे. एवढें लक्षांत आलें तर देशांत अनेक कार्यकर्ते निर्माण होतील. आज राजकारणाच्या क्षेत्रांत जे लोक गुंतले आहेत ते तळमळीचे आहेत याबद्दल वाद च नाहीं, पण त्यांत बुद्धि नाहीं. आजची स्थिति वाईट आहे असें ते लोक सारखे म्हणत राहतात, पण तियें च राहतात. एक साधी गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं कीं, ज्या वृक्षाला तोडायचें आहे, त्यावर बसून कसें तोडतां येईल ? त्याहून अलग राहिलें पाहिजे.

## कल्पना स्पष्ट हवी.

मला आज देशांत तळमळीची, कळकळीची भावना दिसते आहे. पण बुद्धि स्पष्ट नाहीं. मीं आतांपर्यंत सांगितलेल्या अर्थानें हि स्पष्ट नाहीं व दुसऱ्या अर्थानें हि स्पष्ट नाहीं. म्हणजे सत्तास्थानीं गेल्यावर काय योजना करावयाची याविषयीं हि स्पष्ट कल्पना नाहीं. म्हणजे एकूण देशांत बुद्धि च नाहीं. याकरितां उपाय म्हणून मीं १९४८–४९ मध्यें च सांगितलें होतें कीं, परराज्य गेलें, आपलें आलें तेव्हां हा संधिकाल आहे. ज्याप्रमाणें नवें राज्य आल्यावर जुना झेंडा एक क्षण हि राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें जुनें शिक्षण हि चालूं शकत नाहीं. कोणती शिक्षण-पद्धति द्यावी याविषयीं तुमच्या कल्पना जर स्पष्ट नाहींत तर सर्व शाळांना सहा महिने सुट्टी द्या व तेवढ्यांत सर्व शिक्षण-तज्ज्ञ, नेते वगैरेंनीं चर्चा करून योजना ठरवावी. पाण्यांत पडलेला माणूस 'कांहीं तरी' करायला हवें म्हणून वेडेवांकडे हात-पाय आपटील तर बुडेल. तेव्हां त्यानें थोडा वेळ शांत पडून रहायला हवें. आतांपर्यंत आपल्या देशांत जें झालें, तें हातपाय आपटणें झालें. यांत मी कोणाला दोष देत नाहीं. एकूण राष्ट्रांत बुद्धि च नाहीं. बुद्धि असती तर

इतके सारे लोक राजनीतीच्या क्षेत्रांत गुंतून राहिले नसते. अनेकांनीं लोकनीतीच्या क्षेत्रांत उडी घेतली असती. तोंपर्यंत आपल्या मोठ्या योजना वायां जाणार नाहींत, असें काम करावें. त्याकरितां सर्वोदय-पात्रासारखें एक लहान क्षेत्र घेऊन त्यांत यशस्वी काम करून दाखवावें.

---

: ३ :

# ग्रामसेवक

हल्लींच्या काळीं लोक सरकारकडून फार अपेक्षा करीत आहेत. परंतु ज्या प्रमाणांत त्या केल्या जातात त्या प्रमाणांत त्या यशस्वी होत नाहींत. आणि आशेच्या ठिकाणीं निराशा वाटूं लागते. हल्लीं समाजाची अशी स्थिति आहे. जनतेमधून आशा नाहींशी होऊन तिला निराशेनें घेरलें तर तिच्याकडून कांहीं पुरुषार्थ होऊं शकत नाहीं आणि जनतेच्या सहकार्या-शिवाय सरकारकडून कसला हि पराक्रम होण्याचा संभव नाहीं. जनतेच्या सहकार्यानें च सरकारकडून कांहीं काम होऊं शकते. म्हणून सरकारला जर जनतेच्या सहकार्याची जरूरी असेल तर जनतेमध्यें आशा वाटत राहिली पाहिजे आणि ती आशा सफल हि होत राहिली पाहिजे. आज असें होत असलेलें दिसत नाहीं. म्हणून सर्वत्र विफलता आणि निराशा पसरून राहिली आहे. लोकांना आपलें जीवन व्यर्थ आणि विफल आहे असें वाटूं लागलें आहे. स्वराज्यांत मनुष्याला आपलें जीवन विफल आहे असें वाटूं लागलें तर तें फार मोठें संकट आलें आहे असें समजलें पाहिजे. जेव्हां परकीय आक्रमण देशावर होतें तेव्हां च स्वराज्यावर संकट आलें आहे या गोष्टीची अडाणी माणसांना जाणीव होते. परंतु स्वराज्यामध्यें हि लोकांच्या जीवनांत विफलता वाटूं लागली आहे असें दिसतां च जाणत्या पुरुषांना या संकटाची जाणीव होते. असें संकट स्वराज्यावर येऊं नये अशी इच्छा स्वभावतां च प्रत्येकाला असते. स्वराज्य आशामय असावें अशी प्रत्येक माणसाची इच्छा असली पाहिजे. आमचें राज्य हें आमच्या गांवाचें राज्य आहे असें प्रत्येकाला

वाटलें पाहिजे आणि आमचें रक्षण आम्ही च करूं शकूं असा आत्मविश्वास हि त्याला असला पाहिजे. याकरितां सर्वांनीं परस्पराशीं सहकार्य करावें. गोकुळांत असें च होते. प्रथम सर्वांनीं आपापल्या काठ्या गोवर्धन पर्वत उचलायला लावल्या, नंतर च भगवंतांनीं आपली करंगळी लावली. असें प्रत्येक गांवांत असलें पाहिजे. लहानथोर, वृद्ध, पुरुष, स्त्रिया, आयाबहिणी या सर्वांनीं आपला हात स्वराज्य सुखी करायला लावावा असें प्रत्येक गांवीं व्हावें.

आज या गांवीं एक विहीर बांधली गेली. ती कोणी बांधली ? गांववाल्यांनीं सांगितलें कीं, हरिजनाकरितां ती आम्हीं च बांधली. तिचें उद्घाटन करण्याकरितां ते मला घेऊन गेले होते. गावांमध्यें एक चांगलें काम झालें त्यामुळें तहानलेल्यांची तहान दूर होईल.

प्रत्येक काम लोकशक्तीनें व्हावें. प्रत्येक गांवीं कोणत्या ना कोणत्या वस्तूची जरूरी असते. ती लोकशक्तीनें च प्राप्त व्हावी. त्याकरितां लोकांनीं परिश्रम करावे व सरकारनें त्यांना मदत करावी असें झालें पाहिजे. प्रत्येक गांवांत गांवाची सेवा करणारा कोण आहे ? 'गृहिणी गृहमुच्यते' असें म्हटलें जाते. म्हणजे घरांतल्या सर्वांची सेवा करणारी आई असेल तर च तें 'घर' होईल. ज्या ठिकाणीं अशी आई नाहीं तें घर कसलें ? त्याप्रमाणें च ज्या गांवांत ग्रामसेवक नसेल तें गांव कसलें ? त्याला गांव म्हणतां येणार नाहीं. ग्रामसेवक म्हणजे च गांव. मग तो ग्रामसेवक लहान असो वा मोठा असो, कसलाहि असो पण तो सरकारी सेवक नसावा. गांवाची सेवा ग्रामसेवक करील. गांवाचें भलें कसें होईल, गांवाचें कल्याण कसें होईल, याची तो नेहमीं चिंता करीत राहील. आपलें चिंतनसर्वस्व तो गांवाला देईल. प्रत्येक गांवांत असा एक सर्वोदय-सेवक असला पाहिजे. त्याला कोणता पक्ष असणार नाहीं. कोणती जाति असणार नाहीं. कोणता पंथ असणार नाहीं. सर्वांची सेवा करणें हा च त्याचा धर्म आणि पंथ. असें मानणारा ग्रामसेवक पक्षपात करणार नाहीं,

राजकीय वादांतून मुक्त राहील. प्रेम, करुणा, तळमळ त्यांच्या अंतःकरणांत खच्चून भरलेली असेल. तो आळशी असणार नाहीं. तेव्हां च तो गांवाची सेवा करूं शकेल. गांवांत कोणी आजारी असला तर तो त्याच्या सेवेला हजर, शेतांत कुणाला कसली मदत पाहिजे असेल, तर त्यानें या सेवकाला बोलवावें. जिथें जिथें म्हणून मदतीची आवश्यकता असेल तेथें तेथें ती मदत तो देईल. परंतु तो पैशाची मदत करणार नाहीं. कारण त्याच्यापाशीं पैसा असणार च नाहीं. तो केवळ सेवा करील. तुकारामानें एक लहानसें आत्मचरित्र लिहिलें आहे. त्यांत सेवकाचें असें च वर्णन आहे. त्यानें परोपकाराशिवाय दुसरें कांहीं केलें च नाहीं. त्याचें सारें जीवन च परमेश्वरासाठीं होतें. '**तुका म्हणे उरलों उपकारापुरता**' अर्थात् केवळ सेवेकरतां च मी जगलों आहें. म्हणून तर तीनतीनशें वर्षें होऊन गेल्यावर हि आज आम्ही त्याची आठवण करीत आहों. त्यानें लिहिलें आहे 'घडला तेवढा उपकार केला आणि शरीराला कष्टवून सोडलें' ज्या सेवेमध्यें शरीराला खूप श्रम पडतात ती च सेवा सर्वांत श्रेष्ठ आहे. शरीरपरिश्रमानें च सेवा केली पाहिजे असें गीतेनें हि सांगितलें आहे.

## शारीरिक कष्ट सहन करणारे सेवक विरळा.

कोणी चार पैसे मागितले व आपण ते दिलें तर ती सेवा नाहीं. त्याच्याकडे जाऊन शरीरानें च त्याची सेवा केली पाहिजे. मालकाच्या वतीनें तीर्थयात्रा केली तर तिचें पुण्य मालकाला मिळेल, आणि शंभर रुपये घेऊन आठ दहा महिने भाडोत्री तीर्थयात्रा केली तर कांहीं हि पुण्य मिळणार नाहीं. आपण दवाखान्याला एक रुपया देतो आणि त्यांत भूतसेवा केली असें समजतों. परंतु रोग्याजवळ बसून एक रात्रीं जागरण करायला जाऊं असें होत नाहीं. नुसते पैसे देणें ही कसली सेवा? सारांश देहाला कष्टवून सेवा करणारा विरळा च असतो. असल्या सेवकाला हि खायला प्यायला लागते च. तें कोण देईल? तो परमार्थ करतो तेव्हां त्यानें काय उपास च करावा? त्याचा योगक्षेम चालवणें आपलें कर्तव्य आहे असें गांवच्या

लोकांना वाटलें पाहिजे. हा जो नारायण आहे, नरसमुदाय आहे त्याचें हें कर्तव्य च आहे कीं त्यानें अशा सेवकाचें पोट चालवावें. तुमच्या गांवांत हि अशा एका सेवकाची जरूरी आहे. आणि त्याला अर्पण करण्याकरतां प्रत्येक घरांत सर्वोदयपात्र ठेवलें गेलें पाहिजे. सर्वोदयसेवकाकरतां ही योजना आहे. घरांत एकाहून अधिक मुलें असतील. तर एकाऐवजीं दोनदोन तीनतीन मुलांनीं आपल्या लहान लहान मुठींनीं त्या पात्रांत धान्य घालावें. आमचें गांव एक देहू गांव च आहे. त्या देहू गांवचा ग्रामसेवक तुकाराम रोज थोडें भागवत, थोडी गीता स्वतः वाचील व दुसऱ्यांना हि वाचून दाखवील. तो सर्व प्रकारची '**करवें पडली सेवा**' करील आणि गांवांतलें प्रत्येक घर त्याच्या करतां सर्वोदयपात्र ठेवील आणि त्यांत रोज एक मूठभर धान्य घालील. महत्त्व त्या धान्याचें परंतु '**प्रथम द्यावें मग आपण खावें**' या गोष्टीचें आहे. याचें शिक्षण सर्वोदयपात्रानें मुलांना मिळेल. '**त्यक्तेन भुंजीथाः**' प्रथम त्याग मग भोग. या गांवांत जितकीं घरें असतील त्या प्रत्येक घरीं सर्वोदयपात्र असावें. या गांवीं ६०० घरें आहेत असें म्हणतात. अर्थात् रोज ६०० मुठी धान्य जमेल. तें एका सेवकाला भरपूर आहे. सेवक आणि त्याचें कुटुंब यांचा योगक्षेम या सर्वोदय-पात्रांतून होऊं शकेल. अशा तऱ्हेचा एक ग्रामसेवक तुकाराम प्रत्येक गांवीं असला पाहिजे. तीनशें वर्षें होऊन गेलीं तरी देहूच्या तुकारामाचा जयजयकार आज हि होत आहे. त्याप्रमाणें हा गांव देहू गांव बनावा आणि येथला सेवक तुकाराम व्हावा. आपण ग्रामसेवकाचें नांव च बदलून टाकूं व त्याला तुकाराम म्हणूं. कधीं तो वाचील, कधीं वाचून दाखवील, कधीं हातांत झाडू घेऊन गांवची सफाई करीत असतांना दिसेल, कधीं कोणाच्या शेतांत जाऊन त्याला मदत करील, आजाऱ्याची सेवा करील, बाहेर कोठें काय चाललें आहे याची माहिती लोकांना सांगेल. 'भूदान' साप्ताहिक वाचून दाखवील, प्रत्येक आठवड्याला सभा भरवील. अशाप्रकारें गांववाल्यांच्या कानांवर तो ज्ञान घालीत राहील. अशा तऱ्हेच्या सर्वोदय-सेवकाची योजना ज्या गांवीं असेल तें गांव देहू बनून जाईल. **ज्या घरांत गृहिणी नाहीं त्याला घर म्हणतां येणार नाहीं. त्याप्रमाणें ज्या गांवांत तुकाराम नाहीं, तें गांव च नव्हे.**

ग्रंथालय
दा. क्र. ८५८५-

## वानप्रस्थ जनसेवकांची आवश्यकता

आपल्या धर्मांत सांगितलें आहे कीं पंचेचाळीस वर्षांनंतर मनुष्यानें संसारांतून आपलें मन काढून घ्यावें आणि जनसेवेला लागावें, वानप्रस्थ व्हावें. या सहाशें घरांतून कमींत कमीं १०० वानप्रस्थ जरूर निघाले पाहिजेत. ज्यांनीं आपलें मन विषयासक्तींतून काढून घेऊन आत्मचिंतनांत आणि भगवद्भक्तींत लावलें आहे आणि आपलें जीवन जनसेवेला अर्पण केलें आहे असे ते असावेत. त्यांनीं आपल्या अनुभवाचें शिक्षण लोकांना द्यावें. आज तर एक अनुभवहीन मॅट्रिक पास झालेला तरुण शिक्षक बनून मुलांच्यापुढें उभा राहतो. त्याला अनुभव नाहीं आणि व्यवहारज्ञान हि असत नाहीं. कॉमर्स कॉलेजांत कॉमर्स शिकविणाऱ्या प्रोफेसरची ही च स्थिति आहे. चार पैशाचे सहा पैसे करण्याची हि अक्कल त्याला असत नाहीं. तो काय व्यापार शिकवणार ? अमुक प्रोफेसर राजकारण शिकवतो. त्यानें कसलें राजकारण केलें आहे ? राजकारणाचा अनुभव घेतलेले पंडित नेहरू-सारखे प्रोफेसर होतील तेव्हां च विद्यार्थ्यांना खरा लाभ होईल. परंतु नेहरूंना तेथून कोणी सोडीत नाहीं. म्हणून अनुभवहीन लोक विद्यार्थ्यांच्या पाळीला येतात. तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर आहे, पण तत्त्वज्ञान जाणत नाहीं. त्याचा अनुभव हि नाहीं तरी हि प्रोफेसर बनवला जातो. अशा तऱ्हेनें सर्वसाधारण शिक्षकांना हि कसला च अनुभव असत नाहीं. वस्तुतः ४५ वर्षांवरचा विषयासक्तींतून मुक्त झालेला मनुष्य शिक्षक व्हावा असें झालें पाहिजे. म्हणून मी म्हणतों कीं, या ६०० घरांच्या वस्तींतून १०० सेवक मिळाले पाहिजेत. त्यांतलीं दोन शून्यें पाहिजे तर काढून टाका. कमींत कमीं एक तर तुकाराम असावा. त्याची सोय सर्वोदय-पात्रांतून करावी. हा तुकाराम कोठें मिळेल ? पुणें विश्वविद्यालयांत तुकाराम बनवले जातात का ? नाहीं. म्हणून तुम्ही एवढें च म्हणावें कीं, आमच्या गांवाला एक सेवक पाहिजे. आणि त्याच्या योगक्षेमाची चिंता आम्ही करूं या. सगळ्या गांवांत एक हि सज्जन माणूस नाहीं ? रावणाच्या लंकेंत हि एक बिभीषण होता. तुमचें गांव लंकेहून हि वाईट आहे का ? एखादा सज्जन नाहीं, असला

गांव परमेश्वर निर्माण करूं शकेल का ? तुमच्या गांवांत जो कोणी सज्जन असेल त्याला जाऊन सांगा कीं, आम्हांला तुमच्या मदतीची जरूरी आहे. तुम्ही योजना करा, तंटे मिटवा, व्यवस्था चालवा, शिक्षण द्या तुमच्या निर्वाहाची चिंता तुम्ही करूं नका तें आमचें काम आहे. अशा तऱ्हेनें ज्यांच्या चिंतेचा भार तुम्ही घ्याल आणि ज्याच्यावर तुमचा विश्वास असेल अशा सेवकाला ज्ञान पाहिजे. त्याला ट्रेनिंग हि दिलें पाहिजे. त्याची सोय तुम्ही कशी कराल ? हे आचार्य लिमये येथें बसले आहेत. त्यांना हें काम सांगा. त्यांच्यासारखे लोक सेवकांना ट्रेनिंग देतील आणि मग ते सेवक गांवोगांवीं पसरतील.

## जनशक्तीच्या आधारावर च गांवाची प्रगति होईल

अशा प्रकारची योजना प्रत्येक गांवांत बनवा. ज्या गांवांत तुकाराम नाहीं त्या गांवांत राम नाहीं. तो गांव प्राणहीन आहे. म्हणून प्रत्येक गांवांत एक तुकाराम पाहिजे. तुकाराम बनविण्याचा एक कारखाना च उघडून द्या. कमींत कमीं एक तरी परोपकारी मनुष्य तुमच्या गांवीं असावा अशी माझी योजना आहे. अशा तऱ्हेनें गांवांची चिंता करणारे गांवाला आत्मसमर्पण केलेले पांच लाख सेवक पांच लाख गांवाकरितां पाहिजेत. एकादशीच्या दिवशीं ते सेवक एखाद्या गांवीं एकत्र जमतील. " **देहू गांवीं जाऊं राम नामाचा सौदा करूं** " याप्रमाणें दर पंधरा दिवसांनीं हे सेवक एकत्र जमतील आणि आपआपल्या गांवची परिस्थिति आणि अडचणी याविषयीं विचार-विनिमय करतील. एकादशीचा दिवस ग्रामचर्चेचा असावा. एक एकादशी या गांवीं, दुसरी दुसऱ्या गांवीं. याप्रमाणें पांच-पंचवीस गांवचे सेवक एकत्र जमतील, प्रेमानें चर्चा करतील, विचारविनिमय करतील आणि पुनः सेवेकरितां आपआपल्या गांवीं परत जातील. अशा तऱ्हेची एक सुंदर योजना माझ्या मनांत आहे. या चर्चेच्या निमित्तानें ज्या गांवीं एकादशी असेल, त्या गांवचे लोक या १०–१५ लोकांच्या जेवणाची व्यवस्था करतील. सगळे मिळून एकत्र जेवतील. त्या दिवशीं पक्वान्न नाहीं करायचें. फलाहार किंवा अल्पोपहार असावा. कांदा भाकरी वाईट नाहीं. तो हि उपवास च

आहे. उपवासाचा अर्थ काय ? गरीबांचें जेवण घेणें. कोणी म्हणेल मी तर निराहार उपवास करणार आहें. तर तें त्याहून चांगलें. सर्व उपवास करतील, भजन करतील, गांवाची चर्चा करतील तर काय मौज येईल ? सोन्याला सुवास आल्यासारखा होईल. कांदा भाकरीनें माझी एकादशी मोडणार नाहीं. केळीं मिळतील तर अधिक च चांगलें. सारांश एवढा च कीं, सेवकांनीं परस्पर चर्चा करावी, गांवाची चिंता करावी. गांवांत जनावरें मरतात. परंतु प्रत्येक गांवीं टॅनरी होऊं शकत नाहीं. एखाद्या च गांवीं होऊं शकेल. तेव्हां एका गांवांत टॅनरी होईल, दुसऱ्या गांवांत जोडे वहाणा बनतील. परंतु ती टॅनरी या सर्व गांवाकरतां असेल. अर्थात् १०–१५ गांवांमध्यें एक टॅनरी होईल. याप्रमाणें दुसरे कित्येक उद्योग सुरू केले जातील आणि हे सर्व तुम्ही आम्ही एकत्र मिळून करूं. अशा उद्योगांच्या द्वारां गांवामध्यें ऐक्य उत्पन्न झालें पाहिजे. देवाण घेवाण झाली पाहिजे. आपसांत विचारविनिमय हि झाला पाहिजे. अशा तऱ्हेनें जनशक्तीच्या आधारावर गांवाची उन्नति होईल व सरकार हि त्याला मदत करील. याप्रमाणें दोन हातांनीं टाळी वाजली पाहिजे. केवळ एका हातानें टाळी वाजत नाहीं. श्री. एस्. के. डे सांगत होते कीं, गांवांतल्या गरीबांपर्यंत आमची मदत पोंचत च नाहीं. जे लोक ती मदत खेंचून घेऊं शकतात त्यांना ती मिळते. मोट चालली आहे. तिचें पाणी बगीच्यापर्यंत पोंचवण्याकरतां दोन फर्लांगाचा पाट बनवला आहे; पण झाडापर्यंत पाणी च पोंचत नाहीं. पाटांत च जिरत जातें. त्याप्रमाणें सरकारच्या मदतीचें पाणी गरीबापर्यंत पोंचत च नाहीं. मी टीका करण्याकरतां हें बोलत नाहीं किंवा टीका करणारांचें मत हि सांगत नाहीं. सरकारमधला च एक माणूस हें सांगत आहे. याचें कारण काय ? लोकांमध्यें जनशक्ति निर्माण करण्याची योजना च नाहीं. म्हणून आतां असें ठरवण्यांत आलें आहे कीं, सर्वोदयाचे कार्यकर्ते व कम्युनिटी प्रॉजेक्टचे कार्यकर्ते दोघांनीं मिळून सहकार्यानें काम केलें पाहिजे आणि सर्वोदयाचें जें ध्येय आहे तें च ध्येय कम्युनिटी प्रॉजेक्टचें असावें. ध्येयामध्यें अशा प्रकारची सुधारणा हि केली गेली आहे. उद्यां सर्व-

सेवा-संघाची वैठक आहे. तीमध्यें यासंबंधीं चर्चा होईल. सर्व-सेवा-संघ आणि कम्युनिटी प्रॉजेक्ट यांचें सहकार्य असावें. पण तें अमलांत कसें येणार ? एकट्या सरकारची मदत अर्धवट राहील. जनशक्ति–तुकाराम–शिवाय सरकार पंगू पडून जाईल. आणि सर्व-सेवा-संघ हि पंगू च राहील. मी गांवो-गांवीं फिरत आहें परंतु मी किती गांवांत जाऊं शकेन ? लोक पुस्तकें, वाङमय वाचतात. पण वाङमय वाचून त्याप्रमाणें काम करणारीं निघतील तेव्हां ना ? म्हणून गांव लहान असो मोठा असो किंवा शहर असो त्या ठिकाणीं सेवा करणारे लोक निघाले पाहिजेत.

## पावसाळ्यामधें हि यात्रा चालू

पांच वर्षांपूर्वीं मी काशींमध्यें होतों. पूर्वीं पावसाळ्यांत मी एका ठिकाणीं च राहत असे. पहिलीं दोन वर्षें याप्रमाणें केलें. पहिलें वर्षीं पवनारमध्यें राहिलों. दुसरें वर्षीं दोन महिने काशीमध्यें थांबलों. काशीमध्यें होतों तेव्हां रोज १० मैल फिरायला जात च असे. तेव्हां अनुभव आला कीं, दोन महिन्यांत फक्त १३ दिवस च पावसाचा झपाटा सोसावा लागला. तेव्हां मीं ठरविलें कीं, पावसाळ्यांत हि थांबण्याची काय जरूर आहे ? तेव्हांपासून पावसाळ्यांत हि यात्रा थांबली नाहीं. त्या काळीं यात्रा ४ वाजतां सुरू होत असे. अलीकडे ५ वाजतां सुरु होतें. काशीमध्यें मी ४ वाजतां जेव्हां बाहेर पडे तेव्हां मला काशीच्या सेवेकरितां ५–५० स्त्रिया दूध, शाकभाजी घेऊन येतांना दिसत. ही त्यांची काशीची सेवा आहे असें मला वाटतें. कुणाच्या डोक्यावर दुधाचें भांडें, कुणाच्या डोक्यावर भाजीची टोपली व कुणाच्या डोक्यावर फळांची करंडी. याप्रमाणें सर्व येत. हें दृश्य मला रोज दिसें. आणि मी संकल्प करीत होतों कीं, आतां पावसाळ्यांत थांबणें बरोबर नाहीं. आणि शेवटीं मोठी हिंमत करून या महापुरुषानें पावसाळ्यांत हि यात्रा बंद न ठेवण्याचा च निश्चय केला. तिकडे ते सर्व महात्मे रोज फळें, भाजी वगैरे डोक्यावर घेऊन येत च होते. ते माझे गुरु बनले. याप्रमाणें तिसऱ्या वर्षा-पासून पावसाळ्यांत हि यात्रा सुरू राहिली. काशीचे सेवक काशीची

सेवा निरंतर करीत आहेत. त्यांनीं हा सातत्ययोग मला शिकवला. ते माझे गुरु बनले.

## हा कुत्रा च खरा संन्यासी

एका संन्याशाची गोष्ट आहे. तो स्वतःला मोठा अपरिग्रही म्हणवीत असे. त्यानें स्वतःजवळ फक्त एक कमंडलू ठेवला होता. एके दिवशीं त्याला तहान लागली व तो नदीला गेला. त्यानें बरोबर कमंडलू नेला होता. त्याचे मागून एक कुत्रा हि तेथें पोंचला. तो चटकन् पाणी प्याला व पळून गेला. संन्यासी विचार करूं लागला मी अपरिग्रही आहें कीं तो कुत्रा? तो माझ्या मागून आला आणि चटकन् पाणी पिऊन निघून गेला. म्हणून तो च खरा संन्यासी आहे. हा च माझा गुरु आहे असें म्हणून त्यानें कमंडलू नदीला अर्पण केला.

शहरांची सेवा याप्रमाणें होतें म्हणून तीं टिकलीं आहेत. नाहीं तर शहरांच्यापाशीं काय आहे? कांहीं हि नाहीं. त्यांच्याजवळ थोडे कागद आहेत, त्यांना ते नोटा म्हणतात. कांहीं वेगळ्या प्रकारचे दगड आहेत, त्याला ते चांदी, सोनें, हिरे, मोती अशीं नांवें देतात. दूध दही फळें भाजी हें सर्व गांवांत च होतें. म्हणून गांवानें आपल्या सेवेकरितां आणि शहरांच्या सेवे-करितां हि ग्रामसेवक तसे च नगरसेवक उभे केले पाहिजेत.

## गांवच्या ऐक्यांत निवडणुकीनें विघ्न

आज या गांवीं जी विहीर खोदली आहे ती सार्वजनिक आहे. केवळ हरिजनांकरतां नाहीं. हरिजनांकरतां वेगळ्या विहिरीची कां जरूरी असावी? आपल्या विहिरीवर कावळे हि येतात व पाणी पितात. कावळ्यांना तेथें परवानगी आहे आणि हरिजनांना नसावी? म्हणून विहीर सर्वांकरतां असावी. हवा सर्वांची, पाणी हि सर्वांचें, प्रेम हि सर्वांचें. '**संताचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ.**' प्रेमाची साखर वाटली जात आहे असें प्रेम गांवांत असावें. गांवांत कसल्या हि

प्रकारचा भेद असूं नये. भेदाची जरूर च काय ? मनुष्य नागडा उघडा च जन्माला येतो आणि तसा च जातो. मग जीवनामध्यें भेद कशाकरितां ? ज्या गांवांत भेद असणार नाहीं तें च गांव सुंदर. 'ही हरिजनांची विहीर' असली अभद्रवाणी आमच्या कानांवर ऐकायला हि येऊं नये. सोयी-करतां वेगवेगळ्या वस्तींत एकेक विहीर खोदली जाऊं शकते. परंतु वेगवेगळ्या जातीकरतां वेगळ्या विहिरी बनवाव्या हें पुण्याचरण नाहीं पापाचरण आहे. म्हणून विहीर सर्वांकरतां असावी. आणि सोयीकरतां जरूरी असेल तर आणखी हि विहिरी खोदाव्या. हा जातिभेद आतां नाहींसा च केला पाहिजे. बुद्धापासून आगरकर, फुले, राममोहन रॉय, गांधीजी या सर्वांनीं जातिभेदावर प्रहार केला आहे. परंतु निवडणुकीमुळें तो पुन्हां वाढला आहे. जातिभेदाला संजीवनी च मिळाली आहे. ही निवडणुकीची पद्धति इंग्लंडमधून आली. परंतु तेथें जातिभेद नाहीं. धर्मभेद नाहीं. म्हणून तेथली परिस्थिति हि वेगळी आहे. दुसऱ्या भाषेंतले शब्द आपण घेतों तेव्हां त्यांत आपण थोडा फरक करीत असतों. स्टेशनला 'ठेसन' म्हणतात. इमिग्रंटला गिरमिटचा म्हणत असत. वर्धा येथें एक टाऊन हॉल आहे. तेथें सभा भरतात. एकदां अशी च एक सभा होती. तिथल्या एका हरिजनाला विचारलें, कीं सभा कोठें आहे ? त्यानें सांगितलें 'तोंडालांत' टाऊन हॉलला त्यानें 'तोंडाल' बनवलें. बरोबर च आहे. तेथें तर तोंडाळपण, बकबक च चालते. याप्रमाणें बाहेरच्या शब्दांना आपलें रूप दिलें पाहिजे. परंतु निवडणुकीच्या बाबतींत असें केलें गेलेलें दिसत नाहीं. म्हणून या निवडणुकांमुळें जातिभेद वाढून राहिला आहे. म्हणून आतां पहिला प्रहार पक्षभेदावर केला पाहिजे. या राजकीय पक्षांनीं आणि त्यांच्या पक्ष-भेदांनीं देशाला हैराण करून टाकलें आहे. ज्या गांवांत ऐक्य आहे त्याला हि जर आग लावायची असेल तर त्या ठिकाणीं निवडणुका सुरू करून द्या. सर्वांना ठाऊक च आहे कीं, निवडणुकीमुळें च गांवामध्यें फूट पडते. आमचा हि हा च अनुभव आहे. तामीलनाडमध्यें तिरुमंगलम् तालुक्यांत ग्रामदानाचें काम चाललें होतें. ग्रामदानांचीं संख्या वाढूं लागली होती. इतक्यांत तेथें निवडणुका आल्या. त्यांच्यापुढें ग्रामदानाचें कांहीं चाललें नाहीं. ग्रामदानांची संख्या

वाढणें थांबलें. पण ग्रामदान झालें होतें त्या गांवांत फूट पडली नाहीं. त्या ठिकाणीं त्या संपूर्ण तहसीलीचें दान होणार होतें पण तेथें मारामाऱ्या सुरू झाल्या. दोनचार खून हि झाले, कांहीं लोक तुरुंगांत गेले. ग्रामदानाचें काम वाढणार होतें. पण निवडणुकांच्यामुळें थांबलें. काँग्रेसनें एक परिपत्र काढलें. मीं वाचलें नाहीं परंतु ऐकलें. त्यांत लिहिलें होतें कीं, गांवामध्यें जातिभेद असूं नये पक्षभेद असूं नये. परंतु मी म्हणतों कीं याकरतां निवडणूक हि असूं नये व पक्षभेद जर चांगली वस्तु असेल तर ती गांवांत हि असावी आणि वाईट असेल तर ती दिल्लीमध्यें हि असूं नये. अध्यक्ष पक्षातीत असला पाहिजे, राष्ट्राध्यक्ष पक्षातीत असला पाहिजे. त्याप्रमाणें च न्यायाधीश, सैन्य, दवाखान्याचे सेवक पक्षातीत असावे म्हणतात. मग सर्व च सज्जन पक्षातीत असावे असें कां म्हणत नाहीं? कोणत्या हि चांगल्या कामांत पक्ष असूं नयेत. साहित्य-परिषदेमध्यें हि पक्ष नसावेत. मग वाईट कामांत तरी पक्ष कशाला? जातिभेद एकवार चालेल परंतु हा पक्षभेद तरी नाहींसा झाला च पाहिजे, असें म्हणण्याची पाळी आली आहे.

प्रत्येक गांवांत जर सर्वोदय-सेवक असेल तर तो गांवाला सुखी करील. गांवामध्यें भेद राहणार नाहीं. अभेद च असावा, इकडे तो ध्यान देईल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थापना
अनुक्रम २८१७ दि: १९७३
क्रमांक: ४ : ७२०५ नों: दि: १५।२।७३

# सर्वोदय-पात्र म्हणजे भिक्षा-पात्र नव्हे

[ सर्वोदय-पात्राच्या प्रचारासाठीं आंबेजोगाईला (मराठवाडा) कार्यकर्ते घरोघर फिरले आणि त्यांनीं ८२५ पात्रांची स्थापना केली. या घटनेचा उल्लेख करून विनोबांनीं खालील विचार मांडले. रत्नागिरी जिल्ह्यांत राजापूरला ११० पात्रांची स्थापना झाली होती, त्या गोष्टीचा हि विनोबांनीं उल्लेख केला. ]

सर्वोदय-पात्राचें काम कुठें तरी पक्कें मूळ धरून उभें राहणें फार जरूरीचें आहे. त्या योगानें या कल्पनेंतून काय निष्पन्न होतें याचें प्रत्यक्ष दर्शन घडेल. आतांपर्यंत फक्त रत्नागिरी जिल्ह्यांत च या बाबतींत उल्लेखनीय प्रयत्न झाला. इथें मराठवाड्यांत स्वामीजींचें (रामानंद तीर्थ) म्हणणें पडलें कीं, "आधीं सर्वोदय-पात्राचें च काम हातीं घ्यावें. म्हणजे त्या आधारानें बाकीचीं कामें उभीं करतां येतील." मला त्यांचें म्हणणें ठीक वाटलें.

मराठवाडा मागासलेला भाग समजला जातो. कारण येथें नवीन परंपरेचा पायंडा अजून पडायचा आहे. जुनी च परंपरा येथें चालू आहे. ही जुनी परंपरा संतांनीं चालू केली असल्यामुळें चांगली आहे. पूर्वस्मृति आणि श्रद्धा त्यामुळें येथील जनतेंत जागृती आहे. एका दृष्टीनें नव्या कामासाठीं हा भाग कोऱ्या पाटीसारखा आहे. येथें सर्वोदय-पात्राचें काम मजबूत पायावर उभें झालें तर वरची इमारत चांगली बनेल.

सर्वोदय-पात्राची ही कल्पना तसें पाहिल्यास अगदीं नवी किंवा बिन-बुडाची नाहीं. जुन्या झाडावर नवीन कलम करावें तशी ही योजना आहे. आपल्या येथें पूर्वीपासून अशी एक रूढि चालत आली आहे कीं खाण्यापूर्वी थोडा भाग काढून ठेवायचा. आज वैश्वदेव किंवा गो-ग्रास एवढें च त्याचें प्रतीकात्मक स्वरूप शिल्लक राहिलें आहे. धर्म ज्यावेळीं सर्वांगपूर्ण असतो तेव्हां तो जीवनांत मुरलेला असतो. परंतु तो विकलांग झाला कीं नांवापुरता उरतो, आणि प्रतीकात्मक बनतो. तशी आज स्थिति झाली आहे.

म्हणून सर्वोदय-पात्राची कल्पना मीं मांडली तेव्हां स्वाभाविक च लोकांना मधुकरी आणि गोग्रास यांचें स्मरण झालें. धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांना यामुळें च या कामांत गोडी वाटते. अशा रीतीनें या सर्वोदय-पात्राला आधार जरी जुना असला तरी याचा उद्देश मात्र अगदीं वेगळा आणि नवा आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

सर्वोदय-पात्रांतून जमा होणाऱ्या धान्याचा विनियोग नवीन समाज-रचना उभी करण्याच्या क्रांतिकारी कार्यांत केला जायचा आहे. जुनी च रचना कायम ठेवून समाजांतील थोडें दुःख कमी करणें हा याचा मुळीं च उद्देश नाहीं. दुःख हलकें करण्याचें काम हि चांगलें असतें. आणि दुःखाचें मूळ कारण नाहींसें न झालें तरी दुःख-निवारणाच्या कार्याची गरज हि असते. परंतु निवारणाच्या कार्यानें दुःखाचें मूळ नाहींसें होत नाहीं. समाजांतून रोगांचीं मुळें नाहींशीं न झालीं तरी दवाखाने चालवावे च लागतात. परंतु लोकांना उत्तम आरोग्याचें ज्ञान करून देणें, पौष्टिक आहार मिळवून देणें, योगशास्त्र शिकवून आजारी न पडण्याची कला शिकविणें हें कार्य क्रांतिकारी आहे.

मजुराच्या ५० रु. वेतनांत ५ रु. वाढ करवून घेण्याचें आंदोलन हें त्याच्या दुःखनिर्मूलनाचें खरें कार्य नव्हे. मालक-मजूर भेद नाहींसा करणें हा दुःखनिर्मूलनाचा खरा मार्ग आहे. हें व्हायला समाजांत शरीरश्रम-निष्ठा ही जीवनाचा आधार बनली पाहिजे. तर च वर्गभेद आणि विषमता नाहींशी होईल. परंतु हें होत नाहीं तोंपर्यंत मजुरांचें दुःख हलकें करण्याचें काम हि करावें च लागतें. तथापि तें क्रांतीचें काम नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सर्वोदय-पात्रांच्या द्वारें आम्हीं समाजरचना च बदलूं पाहत आहोंत म्हणून हें क्रांतीचें कार्य आहे.

लोक विचारतात "सर्वोदय-पात्राचें धान्य कोण घेऊन जाईल ?" मी त्यांना म्हणतों कीं, तें सुरक्षित रीतीनें तुम्हीं च ठरलेल्या ठिकाणीं नियमित पोंचवायचें आहे. एखाद्या संस्थेमार्फत किंवा व्यापाऱ्यामार्फत त्या धान्यांपैकीं कांहींचें पैशांत हि रूपांतर करावें लागेल. सगळें धान्य खाण्याच्या च कामीं खर्च केलें पाहिजे असें नव्हे. महिनाभर पात्रांत जें धान्य जमा झालें

असेल तें मोजून त्याची किंमत हि कांहीं लोकांना सर्वोदय कार्यालयांत जमा करतां येईल. धान्याचा संग्रह करून त्याला कीड थोडी च लागूं द्यायची आहे ? वजन योग्य केलें आहे कीं नाहीं आणि भाव नीट लावला आहे कीं नाहीं हें पात्र ठेवणारानें च पहायचें आहे. दुसरा कोणी तें तपासणार नाहीं. हें जनशक्तीचें कार्य आहे. यांत कोणी कोणावर चौकी किंवा पहारा करायचा नाहीं. प्रत्येकानें अंतरात्म्याला साक्षी ठेवून काम करायचें आहे.

आतां आंबेजोगाईला सर्वोदय-पात्रें ठेवलीं गेलीं आहेत. येथून च कार्यकर्ते हि निघाले पाहिजेत. मराठवाडयाच्या पांची जिल्हयांचें एका दृष्टीनें हें केंद्रस्थान आहे, आणि एक मोठें शिक्षण-केंद्र आहे. धान्य तर तुम्हीं दिलें परंतु आतां कार्यकर्ते देऊन 'हा सूर्य हा जयद्रथ' असें करून दाखवा.

सर्वोदय-पात्र म्हणजे भिक्षापात्र नव्हे. यांतून ज्या सेवकांना धान्य दिलें जाईल ते स्वतः श्रमनिष्ठ असतील. दुसऱ्यांच्या शेतांत ते काम करतील, सफाई करतील, साहित्य प्रचार करतील. गुजराथेंतील ७० वर्षांचे तपस्वी रविशंकर महाराज या वयांत हि सतत पदयात्रा करीत आहेत. रोज दोनदां चालतात आणि शिवाय ४-५ गुंडचा रोज सूत कांततात. आतां त्या ४ गुंड्यांची बाजारभावानें मजुरी आकारणें हें मूर्खपणाचें आहे. आजच्या चुकीच्या मूल्यामुळें बाजारभावांना कांहीं अर्थ राहिला नाहीं. म्हणून सेवक शरीर-परिश्रमनिष्ठ असले तरी त्यांनीं शरीरश्रमावर च जीवननिर्वाह चालविला पाहिजे हें म्हणणें ठीक नाहीं.

लोक मला विचारतात, "तुमचे कार्यकर्ते कोण आहेत ?" मी म्हणतों, "तुम्हीं च आहांत" एकदां स्वामी रामतीर्थ अमेरिकेला गेले होते. बोट बंदराला लागल्यावर सारे उतरण्यासाठीं घाई करूं लागले. स्वामीजी शांत बसून होते. हें पाहून एक अमेरिकन महिला त्यांच्याजवळ आली आणि म्हणाली, "तुमच्या परिचयाचे येथें कोणी आहेत का ?" स्वामी म्हणाले, "होय." तिनें विचारलें, "कोण आहे ?" स्वामी म्हणाले, "तुम्ही च." त्यांच्या उद्‌गारांत इतकें प्रेम आणि माधुर्य भरलें होतें कीं त्या महिलेवर त्यांच्या वचनाचा खोल परिणाम झाला आणि तिनें स्वामींना बरी च मदत केली.

क्र. क्र. ८५१५



कार्यकर्ते सत्य, अहिंसा, अपरिग्रह, यांवर निष्ठा बाळगणारे, निष्काम भावनेनें सेवा करणारे, आणि पक्षातीत असले पाहिजेत. यांपैकीं लोकांना 'पक्षातीत' ची गोष्ट फार कठिण वाटते. देशांत पक्षातीत लोक पुष्कळ आहेत पण ते शक्तिशाली नाहींत. जे शक्तिशाली आहेत ते कोणत्या ना कोणत्या पक्षांत आहेत. परंतु ज्यांना सर्वांची सेवा करायची आहे त्यांना पक्षांत सामील होऊन कसें चालेल ?

[ यानंतर कार्यकर्त्यांनीं कांहीं प्रश्न विचारले. ]

**प्रश्न** : सर्वोदय-पात्रांतून मदत घेणें भिक्षा स्वीकारण्यासारखें आहे असा आक्षेप शंकरराव देव यांनीं घेतला त्यावर तुमचें काय म्हणणें आहे ?

**विनोबा** : सर्वोदय-कार्यकर्ते भिक्षेवर जगणार नाहींत. ते शरीरश्रमावर च जगतील परंतु त्या श्रमाचें मूल्य आजच्या बाजारभावाच्या परिभाषेंत मोजणें चूक होईल.

सर्वोदय-पात्र ठेवणें म्हणणे सर्वोदयाला संमति देणें आहे. जो हात त्या पात्रांत मूठभर धान्य टाकील तो हात दगडफेक करणार नाहीं. सेवकाची परीक्षा गावकरी च करतील. ते च आपले सेवक सर्व-संमतीनें निवडतील.

**प्रश्न** : सर्वोदय-पात्राचें व्रत आजन्म घ्यायचें आहे काय ?

**विनोबा** : जोंपर्यंत तुम्ही जेवत आहांत तोंपर्यंत या पात्रांत धान्य टाकायचें आहे. समाज-रचना बदलेपर्यंत किंवा याहून दुसरी एखादी चांगली योजना पुढें येईपर्यंत हें काम चालू ठेवायचें आहे. समजा कीं उद्यां गांवोगांव ग्रामस्वराज्य स्थापन झालें आणि घरोघर सेवक निर्माण झाल्यामुळें सेवक नेमण्याचा किंवा त्यांच्या पोषणाचा प्रश्न च मिटला आहे तर त्यावेळीं मूठ-भर धान्य पात्रांत टाकण्याऐवजीं प्रत्येकानें रोज १५ मिनिटें शरीरश्रम करणें हा धर्म ठरेल.

**आंबेजोगाई**

२५-६-५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 2/971 वि: 1909
क्रमांक 7264 नों: दि: 9-5-2009

ग्रंथ संग्रहालय
ग्र. क.
REFBK-0009302
REFBK-0009302